क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/

**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ११२ दिनांक ०७/०६/२००७

**विषय** : खाजगी रुग्णालये महावितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचीवर समाविष्ट करण्याबाबत.

**संदर्भ** : सा.आ. क्र.२० दि. १७.०६.१९६३.

-------

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित मधील कर्मचा-यांना सा.आ.क्र.२० (क) दि.१७.६.१९६३ (वेळोवेळी सुधारित केलेल्या) मध्ये समावेश असलेल्या गंभीर/शस्त्रक्रिया कराव्या लागणा-या आजारांवर कांही खाजगी रुग्णालयांमध्ये उपचार करुन घेतल्यास त्याप्रित्यर्थ होणाऱ्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्याबाबतचा प्रस्ताव महावितरण कंपनीच्या विचाराधीन होता.

२. मा.व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांचेशी विचार विनिमय करुन निम्ननिर्देशित खाजगी रुग्णालयात त्यांच्या नावासमोर रकाना क्र.४ मध्ये नमूद केलेल्या गंभीर आजारांवर/शस्त्रक्रिया कराव्या लागणाऱ्या आजारांवर उपचार करुन घेणे त्या त्या भागातील कर्मचाऱ्यांना सोयीस्कर व्हावे म्हणून सदर रुग्णालये महावितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त सूचीवर घेण्यासाठी मंजुरी दिली आहे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | ठिकाण | उपचारासाठीचे गंभीर/शस्त्रक्रिया करावे लागणारे आजार |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १. | बिस्ने हार्ट क्लिनीक | नागपूर | हृदयविकार (उपचार/शस्त्रक्रिया) |
| २. | गिरीराज हॉस्पिटल | बारामती | हृदयविकार (उपचार/शस्त्रक्रिया)/मेंदुरोग (उपचार आणि शस्त्रक्रिया) |
| ३. | लोकनेते राजाराम बापू पाटील हॉस्पिटल ॲन्ड रिसर्च सेंटर | इस्लामपूर सांगली | अस्थिविकार (उपचार/शस्त्रक्रिया), मेंदूचे विकार, मणका व खुबा यावरील शस्त्रक्रिया व उपचार |
| ४. | दोशी नर्सिंग होम | कोल्हापूर | अस्थिविकार (उपचार/शस्त्रक्रिया) |
| ५. | काळबांडे हार्ट ॲण्ड चेस्ट हॉस्पिटल | औरंगाबाद | हृदयविकार (उपचार/शस्त्रक्रिया), फुफुसाचा कर्करोग |
| ६. | चिमोटे हार्ट ॲण्ड डायग्नोसिस हॉस्पिटल | अमरावती | हृदयविकार (उपचार/शस्त्रक्रिया) |
| ७. | के.ई.एम. हॉस्पिटल | पुणे | हृदयविकार (उपचार/शस्त्रक्रिया) |
| ८. | इन्स्टिटयुट ऑफ युरोलॉजी | पुणे | मूत्रपिंडावरील उपचार/शस्त्रक्रिया |

३. महावितरण कंपनीमधील कर्मचाऱ्यांनी उपरोल्लेखित कोणत्याही रुग्णालयात त्यांच्या नावासमोर दर्शविलेले आजार/शस्त्रक्रिया याबाबत उपचार करून घेतल्यास त्यांना नियमानुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

४. दि.०८.०५.२००७ पासून उपरोल्लेखित रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपचार/शस्त्रक्रिया करून घेतलेल्या/घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमानुसार वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

५. महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी सदर रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपचार/शस्त्रक्रिया करुन घेतल्यास रुग्णालयाच्या मूलभूत दर आकरणीच्या (Basic Hospital Charges) १०% सवलत देण्याची संमती संबंधित रुग्णालयाने महावितरण कंपनीस दिली असल्याने अशी सवलत रुग्णालयाकडून मिळाल्याची संबंधित कार्यालयाने खात्री करुन घ्यावी.

६. रुग्णालयाने कळविलेली दरसूची पुढील तीन वर्षांसाठी कायम राहील. दरसूचीची प्रत सोबत जोडली आहे.

७. सा.आ.क्र.२०(क) दिनांक १७/६/१९६३ मधील वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीच्या संदर्भातील इतर अटी व तरतूदी अबाधित राहतील.

८. सदर प्रशासकीय परिपत्रक दि.०८.०५.२००७ पासून अंमलात येईल.

सोबत : दरसूचीची प्रत.

*( सु. य. पाटील )*
***मुख्य महाव्यवस्थापक (क)***

प्रति

महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे

क्र.साप्रवि/रवका/न.क्र.१२/ No 28498
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
दिनांक :- 12 JUL 2007

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# शु ध्दि प त्र क

विषय : 'दोशी नर्सिंग होम, कोल्हापूर' रुग्णालयाच्या नावात 'कोल्हापूर इन्स्टिटयुट ऑफ ऑर्थोपेडिक्स ॲण्ड ट्रॉमा' असा बदल करणेबाबत.

संदर्भ : प्रशासकीय परिपत्रक क्र.११२ दि.०७.०६.२००७

.....

प्रशासकीय परिपत्रक क्र.११२ दिनांक ०७.०६.२००७ अन्वये महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या मान्यताप्राप्त रुग्णालय सूचीवर अनु.क्र.४ अनुसार 'दोशी नर्सिंग होम, कोल्हापूर' या नावाने रुग्णालयाचा समावेश करण्यात आला आहे. तथापि, सदर रुग्णालयाच्या नावात 'दोशी नर्सिंग होम, कोल्हापूर' ऐवजी 'कोल्हापूर इन्स्टिटयुट ऑफ ऑर्थोपेडिक्स ॲण्ड ट्रॉमा' असा बदल करण्यात आला आहे.

२. तसेच उपचारासाठीचे गंभीर/शस्त्रक्रिया करावे लागणारे आजार, या रकान्यामध्ये सदर रुग्णालयाच्या नावासमोर अस्थिविकार (उपचार व शस्त्रक्रिया) असा उल्लेख आहे. तथापि, मणका, खुबा यावरील उपचार देखील अस्थिविकारामध्येच समाविष्ट असल्याने तसा स्पष्ट उल्लेख या शुध्दिपत्रकाद्वारे करण्यात येत आहे.

३. सबब, प्रशासकीय परिपत्रक क्र.११२ दिनांक ०७.०६.२००७ अन्वये अधिसूचित केलेल्या मान्यताप्राप्त रुग्णालयांच्या सूचीमधील अनु.क्र.४ च्या रकाना २ व ४ मध्ये खालीलप्रमाणे बदल केल्याची नोंद घेण्यात यावी.

| प्रशासकीय परिपत्रक क्र.११२, दि.७.६.२००७ | रुग्णालयाचे अगोदरचे नांव | रुग्णालयाचे नवीन नांव | ठिकाण | उपचार/शस्त्रक्रिया करावे लागणारे गंभीर आजार |
|---|---|---|---|---|
| १. | २. | | ३. | ४. |
| अ.क्र.४ | 'दोशी नर्सिंग होम, कोल्हापूर' | **'कोल्हापूर इन्स्टिटयुट ऑफ ऑर्थोपेडिक्स ॲण्ड ट्रॉमा'** | कोल्हापूर | मणका, खुबा इ. कोणत्याही अस्थिविकारांवरील उपचार व शस्त्रक्रिया |

(सु.य. पाटील)
*मुख्य महाव्यवस्थापक (क)*

प्रति,
१) विभागीय व त्यावरील स्तराची क्षेत्रीय कार्यालये.
२) निगम कार्यालय, मुंबई येथील विभाग प्रमुख व कक्ष प्रमुख.
- यांना महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे.

*K/Adm.Cir – Medical-12*
*06072007*